
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
स. नं. ८८८५

# सिनेमांतील गाणीं



REFBK-0019515
REFBK-0019515

जयहिंद प्रकाशन : मुंबई २

# सिनेमांतील गाणीं

[ मराठी ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
१०५६०

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८५९५

संपादक
गजानन काशीनाथ रायकर
पांडुरंग श्रीधर टिल्लू

REFBK-0019515
REFBK-0019515

स. नं.
स्थळ प्रत

माळी ग्रंथ भांडार
स्टेशनरस्ता पुणें.


★ ★ मूल्य सहा आणे ★ ★

## सिनेमा संगीत ! ★ सिनेमांतील गाणीं गुणगुणणाऱ्यांस

" अहाहा ! किती सुंदर गाणीं आहेत ! ! पुन्हा पुन्हा ऐकावीशीं वाटतात ! ! ! " सिनेमा पाहून झाल्यावर असंख्य रसिक असें म्हणत थिएटरच्या बाहेर जात असतात. पण काय ? घरीं जातात तोंच गाणीं विसरून जातात, एखादें कडवें आठवतें, पुढें कांहींच आठवत नाहीं आणि मोठी निराशा होते.

रसिकांनो, असे निराश होऊं नका. तुमच्यासाठींच आम्ही ही गोडगोड गाण्यांची मेजवानी तुम्हाला देत आहों. पोटभर खा ! ' अयोध्येचा राजा ' हा पहिला मराठी बोलपट. त्यावेळीं **' बाळा कां झोंप येईना '** हें गाणें घरोघरीं ऐकूं येत होतें. अद्यापही त्या गाण्याची मोहिनी जात नाहीं. नवीन नवीन बोलपट लागले कीं त्यांतील गाणीं घरोघर गायलीं जातात. पण कांहीं काळानें त्यांचा विसर पडतो. म्हणून ही गैरसोय दूर करण्याच्या इच्छेनें आम्ही मराठी सिनेमांतील गीतांचें हें **' नवनीत '** रसिकांना सादर केलें आहे. गेल्या पांच वर्षांत असंख्य रसिकांनीं अन् वृत्तपत्रांनीं आमच्या या लहानग्या पुस्तकाचा गुणगौरव केला. आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. प्रिय मित्रांनों ! असाच लोभ ठेवा. आम्ही तुमच्या सेवेला सदैव हजर आहों.

**—संपादक**




★ ★ ★ ★ : २ :

मुद्रक : ज. दि. देसाई : राष्ट्रवैभव प्रेस : मुंबई ४
प्रकाशक : वा. द. बापट : झावबाची वाडी : मुंबई २

ग्रं. नं.
९८५९५

# मराठी सिनेमांतील गाणीं

[ भूपाळी ]

[ १ ]

ऊठ ऊठ लवकरी, श्रीहरी, उघड दयेची कडी,
धाव पाव सावळे विठाबाई, कां मनिं धरली अढी ?
कबीराचे शेले विणुनी त्याचो घालशी घडी,
सांवता माळयाची भाजी खुडुनी त्याची बांधिशी जुडी !
दामाजीच्या साठीं झाला महार ना तातडी,
पायीं वहाणा, हातीं काठी, खांद्यावर घोंगडी !
जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी,
एकनाथा घरिं पाणी वाहिलें गंगेच्या कावडी !
गजेंद्राचा धांवा ऐकुनि वेगें घालशी उडी,
अनाथ मी अपराधी मजला उतरा पैलथडी !

[ २ ]

भावे करितां गोसेवेला। मोक्षपदहि लाभे जीवा ॥ धृ० ॥
शून्य सदन, नच धेनु दिसे तें। व्यर्थ इतर हो संपदा ॥ १ ॥
—रांगणेकर; —श्यामसुंदर, कृष्ण ( शाहू मोडक )

[ ३ ]

वानुं किती रे सदया विठुराया दीनवत्सला ॥
दीनवत्सला धावुनि ब्रीदासि राखिलें ॥
अमृतचि हें बोळलें। कृष्ण रूपडें देखियलें ॥
विश्व अवघेंचि त्यांत विरलें हें ध्यान सावळें ॥ १ ॥
—शांताराम आठवले; —संत तुकाराम, तुकाराम ( पागनीस

[ ४ ]

वन्दित राधा बाला। गोपसख्या घननीळा ॥
श्यामल प्रेमळ नंदकुमार–ब्रह्म सानुलें हें साकार
जणुं स्वर्गींचें सुम सुकुमार

मोहवि परिमळ हृदया-गोपसख्या घननीळा
करी दुरी-पाप हरी, निरसुनि माया,
पावन करी जगताला ॥

—शांताराम आठवले; —गोपाळकृष्ण, राधा ( शांता आपटे )

[ ५ ]

रामसखा कुणी दावा !
दीन अंध मी; मार्ग न ठावा। हात दयेचा द्यावा !
राम अयोध्यावासी वदती
वृंदावनिं तो कुणी सांगती
मंदिरांत कुणी तया पाहती
गिरिकंदरीं भेटे कुणि म्हणती
मनोमंदिरीं बघूं शकें मी
दीप असा उजळावा ! राम सखा मज दावा

—स. अ. शुक्ल; —संत तुळसीदास, तुळसीदास ( पागनीस )

[ ६ ]

भाव भुकेला हरी-करितसे भक्तांची चाकरी ॥ ध्रु० ॥
भेटी आला भक्त सुदामा
भुलला त्याच्या भक्तिप्रेमा-
दैन्य तयाचें हरी-करितसे भक्तांची चाकरी ॥ १ ॥
त्रैलोक्याचा धनी श्रीपती
सुखें होऊनी पार्थसारथी
श्रमे पाण्डवाघरीं-करितसे भक्तांची चाकरी ॥ २ ॥
भक्त कबीरा-कृष्ण कृपाळू
विणूं लागतो शेले शालू
बैसुनि मागावरी-करितसे भक्तांची चाकरी ॥ ३ ॥
अंगण झाडी-जातें ओढी
संत जनीच्या घरीं कावडी
रांजणांत हा भरी-करितसे भक्तांची चाकरी ॥ ४ ॥

—शांताराम आठवले; —संत सखू, सखू ( हंसा )

[७]

आकळे न अघटित घटना तव दयाघना ।
कां रुचे अधोगति ऐसी या विभूतिना ? ॥ ध्रु० ॥
सिद्ध पुरुष सद्गुरु असुनी ।
मग्न होती मायाव्यसनीं ।
कैंचि करिती तप नाशोनी आत्मवंचना ॥ १ ॥

—गोविंदराव टेंबे; —मायामच्छिंद्र, गोरख ( विनायक )

[८]

हे दयाघना, देवा, तारी तूं आम्हां । सकलां ॥
येई झडकरी, आतां कंठ शोषिला, अमुचा ॥ हे० ॥
पाहसी किती, ऐसा अंत माधवा-आतां ॥
तूंच एकला त्राता, तूंच मम जिवा-आशा ॥ १ ॥

—रांगणेकर; —भक्त प्रल्हाद, प्रल्हाद ( शाहू मोडक )

[९]

ग राणी, मधुराणी
का ओठ तुझे हसले
कसलें स्वप्न तुला पडलें ?
पहिला वहिला सख्या पाहिला । प्रीतीचा संसार, कसलें० ॥
अश्वावर अमुची स्वारी
तूं राणी हृदयविहारी
स्वप्नतरंगीं प्रीत रंगली । कंठिं भुजांचे हार, कसलें० ॥
वसंत फुलवित येई रे जगा
प्रीत पालवी सख्या जिवलगा
वसंत माया कवळी काया
प्रणयाचा अभिसार करोनि । भेटाया सजले, कसलें० ॥
दारीं फुलला ग पारिजात
झिम झिम नाचत ये बरसात
झलीत पावलें फुलें जलाचीं

हृदयीं ग हळुवार
जल कौमुदिच्या मधुर मीलनीं
बालकमल फुललें। पडलें गोड स्वप्न असलें—कसलें० ॥

—राजा बढे; —रामराज्य, नर्तिका ( बेबी शीला-बेबी कमला )

[ १० ]

" प्रेमवेडी बालिका—
करुणा न ये काय कान्ता ?
बघतां किती अंत आतां ?
चंद्रहि चंचल आला गगनीं
मग कां राग नाथा ?
फुलुं द्या बाग आतां !—"

—वि. स. खांडेकर; —देवता, पुष्पा ( मीनाक्षी )

[ ११ ]

कशाला उद्याची बात ?
बघ उडुनि चालली रात।
भरभरुनि पिऊं। रसरंग नऊ
चल बुडुनि जाऊं रंगात। कशाला० ॥
ये यौवना बहार-लुटूं या, लुटूं या।
भरंवसा न ज्वानीचा- दो दिन ही साथ
हांसत करी घात !

—अनंत काणेकर; —माणूस, मैना ( शांता हुबळीकर )

[ १२ ]

राधिका चतुर बोले-
" तुझी माझी प्रीत जुळे-कान्हा-!!
चल, प्रीतिपंख पसरूं-
गगनीं स्वैर फिरूं-हां हां !
गिरीशिखर—सागरांना-
लंघुनि मेघांना-हां हां !

१८५१४

नवलाख दिव्य रमणी-
मंगलमय गाणीं-
आळविती गगनीं-
मधिं कान्त शान्त हंसरा-
करिती फेर पुरा-हां हां ! राधिका० !!
ही तेजाची गंगा !
चल चल, श्रीरंगा !
घालुं इथें पिंगा-
करूं प्रेम अमर अपुलें-
तुझी माझी प्रीत जुळे-कान्हा !!
कान्हा-कान्हा-कान्हा-"

—शांताराम आठवले; —शेजारी, गिरिजा ( जयश्री )

[ १३ ]

सखे ग प्रेम मनीं फुललें
घेउनि हातीं अमृत प्याले । सुख दारीं आलें ॥ १ ॥
मुग्ध कळीला पवन भेटला । नवजीवन नटलें ॥ २ ॥
मनें मनाला मिळलीं जुळलीं। भेदभाव विरले ॥ ३ ॥
दिसे प्रीतीच्या प्रतिबिंबांनीं। जग अवघें भरलें ॥ ४ ॥

—शांताराम आठवले: —दहा वाजतां, आशा ( रत्नमाला )

[ १४ ]

हवास मज तूं हवास सखया ॥ ध्रु० ॥
हृदयीं माझ्या भाव उसळती
ओठावरती शब्द नाचती
रचावया परि कविता-पंक्ती-
हवास मज तूं हवास रे ॥ १ ॥
भुलविती सुखविती रसिक मनाला
सुमनांचा मी संचय केला
गुंफाया परि मोहक माला-
हवास मज तूं हवास रे ॥ २ ॥

असे कुंचली रंगही असती
धवल फलकही आहे पुढती
रेखाया परि रम्य आकृति-
हवास मज तूं हवास रे ॥ ३ ॥
स्नेहही आहे, आहे पणती
मंदिरांतल्या मूर्तीपुढती
उजळाया परि जीवन ज्योती-
हवास मज तूं हवास रे ॥ ४ ॥

—शांताराम आठवले; —दहा वाजतां, आशा ( रत्नमाला )

[ १५ ]

लागले मिटाया डोळे
अंगाई गीत गा आतां,
पुरेत असलीं रुसणीं फुगणीं
उद्यां रंगूं या मधुरमीलनीं
आज गातसे निद्राराणी
विसरूं तूं मी या जगता अंगाई गीत गा आतां—
तुझीं ग माझीं लटकीं भांडणें
शब्द त्यांतले लढती हटानें
जणूं भराऱ्या घेती सख्याणे
कुणी पांखरें नभिं दिसतां अंगाई गीत गा आतां—
विवाद आतां नकोत तसले
भाव मनाचे पुरते जुळले
विसरुनि सगळें झालें गेलें
स्वप्नीं पाहुंया पुढिल कथा। अंगाई गीत गा आतां—
लागले मिटाया डोळे—

—माडगूळकर; —पहिला पाळणा, चित्रा ( शांता हुबळीकर )

[ १६ ]

चंदेरी दरिया नाचे रे सखया !
जाऊं चल निवांत पैलतटा !

झरझर झरझर कापीत पाणी
जाई बाई, जलराणी हरिणीवाणी
आल्या नाचत डोलत लाटा!
हळु हळू वल्हव साजणा!
थरथरे उरीं नाव ना
खट्याळ नयनीं बघुं नको,
जा छळूं नको!

—वि. स. खांडेकर; माझं बाळ, शशी ( मीनाक्षी )

[ १७ ]

लाडक्या राणीला, लागले डोहाळे
पुरवा सोहाळे, रामराया—
आनंदी आनंद, कोंदला मंदिरीं,
सौभाग्यसुंदरी सीता राणी—
लाजेची ग लाली, गोरटलेल्या गालीं,
मुखावर आली, गर्भकान्ती—
पहिला संकोच, पहिली ग भीती,
सती गर्भवती, सीता माई—
मनीं हुरहूर, सासू देई धीर,
संभाळ जानकी, वंशाचा अंकूर—
तान्हेल्या बाळाची, उद्यांची ग आई,
लाजे सीतामाई, मनोमनीं—

—राजा बढे; रामराज्य, चित्रलेखा ( रंजना )

[ १८ ]

जाऊं नको दूर असा मीच तुझी छाया!
लावूं नको घोर जिवा तोडुनियां माया!
हृदय-कुसुम माझें वाहियलें पायां!
मानुनि निर्माल्य तें तुडवुं नको वांया!
रामसख्या, पतित नसे तव सीता जाया!
प्रीत प्रतिक तुझें वाहतसे पोटीं,

सत्वरि माघारिं ये त्याच जिवासाठीं !
प्रतिकाची निगराणी करूं संगे राया !

—बाबूराव गोखले; —चिमुकला संसार, मंदा ( मीनाक्षी )

[ १९ ]

माझा चिमुकला संसार !
भरल्या संसारीं माझ्या । दोघांचा अधिकार !
प्रकाश प्रतिदिनीं येऊन सदनीं । उजळवील अंधार !
सौगंधानें कुसुम ताटवे । सजवतील शिणगार
शांतिसुखाचे घडे आम्हांवर । धरतिल संततधार !
कवि स्वच्छंदें रचतिल येथें । काव्याचा संभार !
निराकार प्रीतिच्या कल्पना । होति इथें साकार !
अभंग राहो देवा, माझें सौख्याचें भांडार !

—बाबूराव गोखले; चिमुकला संसार, मंदा ( मीनाक्षी )

[ २० ]

पाहूं रे किती वाट ?-जिवलगा !
हिण्डते धुण्डते-होई न भेटी
प्रीतीचें निधान-येई न हातीं !
झाली बाला श्रान्त !—जिवलगा ! ॥
वन सळसळतें-मन तळमळतें
प्राणसख्या तव-चाहूल येते-
भेसूर घन तिमिरांत !-जिवलगा ! ॥
सागर खवळे-उसळति लाटा
झुंजत तयांशीं-हांसशी नाथा !
काहूर मम हृदयांत !-जिवलगा ! ॥
होईल केव्हां-मीलन अन्तीं ?
अवचित जुळतिल-प्रीतिज्योती !
विश्वाच्या प्रलयांत !-जिवलगा !
पाहीन तोंवरीं वाट-जिवलगा ! ॥

--शांताराम आठवले; --माझा मुलगा, नलिनी ( शांता हुबळीकर )

[ २१ ]

उसळत तेज भरे गगनांत
उजळे मन्दिर—शिखर विराजे-
सोनेरी किरणांत !
गाभाऱ्यांतिल मूर्ति चिमुकली
न्हाली नव तेजांत !
प्रांगणांतले तरु मोहरले—
पसरे गन्ध दिशांत !
उत्साहाचे भरले वारे—
पवनाच्या हृदयांत !
ओढ लागली त्या तेजाची
मम जीवा विरहार्त
हृदय परी कां अजुनी माझें ?
फिरतें अन्धारांत !
उजळिल अन्तर कधीं ' निरन्तर '
घेउनि निज रूपांत ?
उसळत तेज भरे गगनांत !

—शांताराम आठवले; माझा मुलगा, नलिनी ( शांता हुबळीकर )

[ २२ ]

मज फिरफिरुनी छळिसि कां ?
गुणगुणुनी कानीं—
कां-? वदे फुलराणी ॥ ध्रु० ॥
हीं गूढ गीतें गासी कशाला ?
तूं भृङ्ग काळा-मी गौर—बाला !
मी रूपखाणी-पुष्पराणी !
वनीं रानीं नसे कोणी—
पाहीं माझ्यावाणी ! ॥ १ ॥

—शांताराम आठवले; माझा मुलगा, नलिनी ( शांता हुबळीकर )

[ २३ ]

अजि हा राम वनीं जाई । लक्ष्मण सीतामाई
सकल अयोध्यावासी जनता । शोक-विकल होई
'राम राम' हा फोडुनि टाहो । दशरथ मृत हो पाही !
धाय मोकले सति कौसल्या । वत्साविण धेनूही !
रामावांचुनि सुनी अयोध्या । प्राणाविण तनु राही !

—स. अ. शुक्ल; संत तुळसीदास, तुळसीदास ( पागनीस )

[ २४ ]

जाग जाग जाग सख्या उजळल्या दिशा
शशिमंडळ पश्चिमेसि अस्त पावलें
तारेही बघ विलिन होऊं लागले
हंसवाया तुजसी विमल हांसते उषा ॥
मधुर हा प्रभात वात गात वाहतो
प्रीतीचें गीत तुझ्या गानिं गुंजतो
ऐक तुला गाती शुकसारिका कशा ॥
जाग जाग जाग सख्या उजळल्या दिशा

—माडगुळकर; —पहिला पाळणा; चित्रा ( शांता हुबळीकर )

[ २५ ]

गगनिं दीप लागले ! कुठें बाई कान्हा ?
लगबग पांखरा परतुनी ये घरा !
चंद्रकोर लोपली;
फुलें झोपलीं ना !
मंदिरिं मी एकटी फिरे;
घांस तुझा हातिं हा उरे !
हृदय रे तुजविण झुरे,
वाट किती पाहूं ! नंदलाल ये ना

—वि. स. खांडेकर; —माझं बाळ, शशी ( मीनाक्षी )

[ २६ ]

उचल पाउलें आश्रम हरिणी। जायाचें ग दुरी
सोडुनि जाऊं कशी वैभवें। नटलि अयोध्या पुरी
पुरे जाहल्या आठवणी या। जायाचें ग दुरी—

पाहिला न पुरतेपणीं
श्रीरामचंद्र लोचनीं
एकदां दावा कुणी

थांब विहंगा परत नेइरे, । वाहुनि पंखांवरी
बघुं दे डोळां पुन्हां अयोध्या। हौस न पुरली पुरी
विसर अयोध्या विलासमंदिर। उंच उंच गोपुरें
कशास वैभव हवें आम्हीं तीं। वनवासी पाखरें

—राजा बढे; —रामराज्य, वासंती–ब्राह्मणपुत्र ( बेबी तारा–फणसे )

[ २७ ]

कुणीतरी सांगा हो सांगा !
माझा जिवलग मिळेल कोठें !
प्रभु तो मिळेल कोठें
कुणीतरी सांगा हो सांगा !
शांतिसुखाचा अवघा ठेवा
सखा प्रीतिचा प्राण विसावा
जगीं कधीं आढळेल कोठें ?
प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा० !
पळभर नाहीं चैन जिवासी
भरल्या संसारीं वनवासी
जीवन वाटे शून्यच खोटें !
जिवलग मिळेल कोठें ?
प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा० !

चार दिसांची इथली वसती
मिळणार मातींतच मातीं !
पडे जिवाला कोडें मोठें
जिवलग मिळेल कोठें ?
माझा प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !

—स. अ. शुक्ल; —भक्तीचा मळा, गजरा ( अमीर कर्नाटकी )

[ २८ ]

आनंद देई अलि-सुमन-लीला
नव माधुरी ये गुंजार माला ॥ ध्रु० ॥
सुकुमारशा नव कुसुम बालां ।
भ्रमरी गमे येई चुंबावयाला ॥ १ ॥

—गोविंदराव टेंबे; —अयोध्येचा राजा, तारामती ( दुर्गा खोटे )

[ २९ ]

चंद्रिका विहार करी मोद देतसे चित्ता ॥
चंद्रिका सुहास्य वरी, नाशि सकलही चिंता ॥
धवल किरण हे शशिचे, विमल रुदन कीं शिशुचें ॥
बालकां शिरीं धरुनि मिरवि पौर्णिमा माता ॥ १ ॥

—गोविंदराव टेंबे; —मायामच्छिंद्र, कीलोतला ( दुर्गा खोटे )

[ ३० ]

वाटला संसार सोपा । परी पसारा व्याप हा ॥
एक होतां जीव दोन्ही । जाहलीं तोंडें दहा ॥
वर्ष सरतां एक छकुलें । अर्पि कांता नेम साधुनि ॥
बोलकें पंचाग सांगे । वर्षफल राशी ग्रहा ॥ १ ॥

—गोविंदराव टेंबे; मायामच्छिंद्र, शंखनाथ ( राजाराम पुरोहित )

[ ३१ ]

आली मुरकत राणी । राणी ग ।
तिच्या नयनींचें लाडिक पाणी । पाणी ग ।
डोळे भरून । रूप तिचं बघून । गेलें मन मोहून ।

सखये ग तिचं तेज चांदणीवाणी ॥
चैती पुनवेची ती रात ग । रात ग ॥
आली पिरतिची उसळून लाट । लाट ग ।
केला शिणगाराचा थाट । थाट ग ।
नौतिचा झोंक नोक, सखे ग ।
परि गोष्ट घडली ही सपनीं ॥ १ ॥

—शांताराम आठवले; —अमृतमंथन, पहारेकरी ( वसंत देसाई )

[ ३२ ]

एक होता राजा । एक होती राणी ॥
अचल तयांची अनुपम प्रीति ॥
दिव्य तयांची सुंदर नगरी । दुःख न तेथें वास करी ॥
विटुनि आपल्या सदना उतरे । स्वर्ग सौख्य जणुं भूमिवरी ॥
बोले राणी ' मन्मनमोती '। राजा बोले ' मी मनचोर ' ! ॥
राणी बोले—' चंद्रिकाच मी ' !
बोले राजा—' मीही चकोर ' ॥
प्रणयोद्यानीं करिती क्रीडा ॥
दंग नर्तनीं हर्ष भरें ॥ नाचति लतिका फुलें, झरे ॥

—शांताराम आठवले; —कुंकू, नीरा( शांता आपटे )

[ ३३ ]

अहा भारत विराजे । जगा दिपवित तेजें ।
भादव्यांत येती गौरी-गणपति उत्सवा येई बहार ।
मेळे आरास करोनि,-गाती हंसुनि नाचूनी ।
ध्वनि त्यांतहि गाजे, ' अहा भारत विराजे '।
जगा दीपवित तेजें ॥ १ ॥

नवरात्र पूजेची आश्विन शोभा । करिती नारी शृंगार ।
लेऊनि वसनें मजेदार, गळां विविध अलंकार,
ध्वनि त्यांतूनि निनादे ॥ अहा भारत विराजे ॥ २ ॥

आली दिवाळी, भूवन उजळी, आनंद घे अवतार ।
दीपक नभींचे भूवरी येती । दाविती शोभा अपार ।

मुदित हृदय सजती करित । सकल जनविहार ।
माला तोरणें फुलांचीं । वसनें, भूषणें जनांचीं ।
शोभा पाहुनि धरेची । मनीं स्वर्गही लाजे ॥ अहा भारत० ॥

—शांताराम आठवले; —कुंकू, अक्का ( वासंती )

[ ३४ ]

दिवाळी दिवाळी आली !
हासत नाचत खेळत आली !!
बहर उडाला बहर!-बहर उडाला !
दिवे उजळले-रंग पसरले ॥
बगिचा बहरला-फुलला कलिजा
उमलुनी आला-बहरुनि गेला !
फुलल्या मनीं कळया— !
तारा नयनींच्या—
थरकत चमकत-फुलल्या खुलल्या !
छान, छान, छान ! ॥
गोड, गोड, गोड !!

—अनंत काणेकर; माणूस, मैना ( शांता हुबळीकर )

[ ३५ ]

चल थरकत मुरकत डौलांत रे
खुले धरतीचा नूर नव्या नवलांत रे ॥ ध्रु० ॥
चैत वैसाखाच्या संग
शिणगाराला नवा रंग
आली लगीनसराई थाटामाटांत रे ॥ १ ॥
ज्योतीलागी मिळे ज्योती
झरे पिर्तीच्या अम्रिताची बरसात रे ॥ २ ॥
नेऊं वाजत गाजत
राजाराणीची वरात
गड्या, मिरवत चंदेरी रथांत रे ॥ ३ ॥

जाईल साडेसाती दूर
येइल कमाईला पूर
जरा खाऊं, पिऊं, राहूं रंगढंगांत रे ॥ ४ ॥

—शांताराम आठवले; —दहा वाजतां, गाडीवान ( वसंत देसाई )

[ ३६ ]

वसन्त फुलला मनीं–सखे ग। वसन्त फुलला मनीं ॥
आशेचीं फुललीं फुलें,
वनवासन्ती ही डुलें,
मन हिंदोळ्यावर झुलें,
आनन्द भरे नंदनीं सखे ग। वसन्त फुलला मनीं ॥
भाग्याची ही उजरी वेळा,
रसवन्तीचा भरला पेला,
कधीं एकदां पाहिन डोळां,
फडफडे हंस लोचनीं–सखे ग। वसन्त फुलला मनीं ॥
उगवे गगनीं पहाटतारा,
रामनगरीचा आला ग वारा,
कानांत सांगतो संदेश सारा,
वाजलें पाऊल, लागली चाहूल
नाचती निर्झर, रानांतलें ग मनांतलें,
जलांत हसल्या नलिनी–सखे ग। वसन्त फुलला मनी ॥

—राजा बढे; —रामराज्य, वासंती ( राम मराठे )

[ ३७ ]

तुझाच छकुला-तुझाच गे-मम माउली ! ॥
गोकुळीं राखी गोधना, नन्दबाळ मी कान्हा।
यमुनातीरीं चारित धेनू। धरितो हांसत अधरीं वेणू
झन् झन् झननन, वाजे खननन ।
भुलति सकल व्रजबाला ! ॥

—शांताराम आठवले; —गोपाळकृष्ण, कृष्ण ( राम मराठे )

[ ३८ ]

होईल गम्मत—देशील जम्मत
मला आणुनी ! ॥ ध्रु० ॥
हातावरचें घड्याळ सुन्दर !
करितें टिकटिक पळतें भरभर !
टाकायाला लगेच फोडुन ?
अं हं ! बांधिन हळूच जपुनि ! !
मोटार गाडी सुरेख रंगित—
पों पों करुनि हांकित ऐटित !
बाबा, तूं मी येऊं फिरुनी !
आई ! तूं, मी येऊं फिरुनी !
बोलती रागें उगीच तुजसी
म्हणुनि गडी फू करिन तयासी !

—शांताराम आठवले; —माझा मुलगा, श्याम ( बालकराम )
दिवाकर ( शाहू मोडक )

[ ३९ ]

आम्ही वळखूल ग । वळखूल ग
वळखूल ग !
मनच्या मनची खूण !
का नां त कु न कु न
ज नां त गु न गु न
मनांत लपूलं—जनांत दिसलं !
वळखूल ग ! !

—अनंत काणेकर; —माणूस, चिचुंदरी ( मंजु )

[ ४० ]

रंगांत रंगलं ! छंदामधें दंगलं
गुंगून मन हें आनंदलं !
गोड सोहळा बघुनी डोळां
जीवाचं भान बाई हरपलं !

पालखींतुनी मिरवे हा संतराणा
आनंद कोंदे अवघा दाही दिशांना
मंगल वाद्यें गरजति सुस्वर
नाचत डोलत जनमेळा
भक्ति-जिव्हाळा नव नवलाचा
उगवे पहा भाग्य वेळा !

—स. अ. शुक्ल; —संत तुळशीदास, सरस्वती ( वासंती )

[ ४१ ]

माझ्या मामाच्या घरीं । मामीचें बघ राज्य रे !
घरीं बाबा आणि मी । आणीक नाहीं कुणि तिसरें ।
आणि धाकटी वहिनीदादा । तुला सासरीं धाडिल ती ना ?
जमवुनि शेजारिणी मैत्रिणी
खेळत राहिल सदा अंगणीं
छळील अपुल्या नणदेला । भीति कुणाचिही नाहीं तिला
माझ्या दादाच्या घरीं । वहिनीचें बघ राज्य रे

—स. अ. शुक्ल; —संत तुळशीदास, सरस्वती ( वासंती )
भोला ( राम मराठे )

[ ४२ ]

बघ मंगल दिन आला । चल चल रे मुंज मुला ॥ ध्रु० ॥
घालुनियां लंगोटी । दंड उभा घे हातीं
मग म्हण रे ओम् भवति ॥ १ ॥
दर्भांनें तव मांडी चिरतिल
बेटकुळी मग तिच्यांत भरतिल
आंत उड्या ती टुणुटुणु मारिल !
घरभर भरभर गरगर फिरशिल ॥ २ ॥
यज्ञोपविता करुनी धारण
गायत्रीचें मंत्रोच्चारण
ब्रह्मचारी मी गुरुघरीं जाईन
होइन ज्ञानी दिपवीन सकलां ॥ ३ ॥

काशीला तूं निघशील जाया
तुला आडविल मामा राया
बोले देईन कन्या या या
ब्रह्मचारी मग फिरला फसला ॥ ४ ॥

—शांताराम आठवले;—संत ज्ञानेश्वर, मुक्ता-सोपान (सुमित्रा-गोविंद)

[ ४३ ]

गोड गुपित कळलं मला ॥ ध्रु० ॥
मांडव घाला करा तयारी । नवऱ्याला ही पसंत नवरी ॥
मुहूर्त ठरवा चला । गोड गुपित कळलं मला ॥ १ ॥
नवरा नवरी सजवा मिरवा । जेवण घाला, गांव बोलवा ॥
खडींचे लाडू वळा । गोड गुपित कळलं मला ॥ २ ॥
लाजूं नको ग, घांस घाल ना । ऐका ऐका गोड उखाणा ॥
करूं नका गलबला । गोड गुपित कळलं मला ॥ ३ ॥
'समोरच्या कोनाड्यांत ठेवले पेढे । अशोकपंत झाले प्रेमानें वेडे'
म्हणुनि भाळले हिला । गोड गुपित कळलं मला ॥ ४ ॥
वहिनी माझी आशा राणी । मुलांमुलींची गोजिरवाणी ॥
सेना होवो तिला ! गोड गुपित कळलं मला ॥ ५ ॥

—शांताराम आठवले; —दहा वाजतां, उषा (बेबी शकुन्तला)

[ ४४ ]

हांसत वसंत ये वनीं—अलबेला !
प्रियकर पसंत हा मनीं—धरणीला !!
घन-वनराई-बहरुनि येई
कोमल मंजुळ-कोयल गाई !
कुहू कुहू कुहू कुहू !
आंबा पाही फुलला !
चाफा झाला पिवळा !
जाई जुई चमेलीला
भर आला शेवन्तीला !
घमघमला-हां-!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे शाखा (स्थळ प्रत) १९५७८

सतेज टवटवली-
कळी जशी कवळी !
नभांत लुकलुकली !
चंद्रकोर इवली !
आला शीतल वारा !
बरसत अमृतधारा !
मृदुल फुलांचा करी झुला-
अलबेला-हां !
हांसत वसंत ये वनीं—अलबेला
प्रियकर पसंत हा मनीं—धरणीला !!

—शांताराम आठवले; —शेजारी, गिरिजा-रायत्रा ( जयश्री-चंद्रकांत )

[ ४५ ]

सखया ! सजणा ! राया !
मनिं वसंत सुंदर फुलला
जीवभृंग रसरंगा भुलला
प्रीतीचा नव बहार खुलला
साजणी ! तूं राधा बाळी
प्रेमळ सजला हा वनमाळी
हृदय कुंज साजरा उमलला ! सखया !
चल नाचूं या ! रास रचूं या ।
प्रणय-मुरलीचा नाद घुमवुंया । सजणा ।
कुंजवनीं या खेळूं कन्हैय्या !
मनिं वसंत सुंदर फुलला !

—स. अ. शुक्ल;—संत तुळशीदास, रत्ना ( लीला चिटणीस ) तुळशीदास ( पागनीस )

[ ४६ ]

लख लख चन्देरी तेजाची न्यारी दुनिया
झळाळति कोटी ज्योती या !!
चला धरूं रिंगण—

चुडी-गुढी उंचावून !
आकाशींच्या अंगणांत
मंजुळ रुणझुण !
नाचती चंद्र तारे वाजती पैंजण—
छुन् छुन् झुम् झुम् हां ॥ लखलख० ॥
झोत रुपेरी-
भूमीवरी गगनांत !
धवळली सारी सृष्टी-
नाचत डोलत !
कणकण उजळीत । हांसत हसवीत-
करी शिणगार हा हां ॥ लखलख० ॥
आनंदून रंगून-
विसरुन देहभान !
मोहरली सारी काया-
हारपली मोहमाया
कुडी-चुडी पाजळुन-प्राणज्योती मेळवून
एक होऊं-या हां हां ॥ लखलख० ॥
—शांताराम आठवले;—शेजारी, नाचणारे लोक, (रायबा, गिरजा संघगीत)

[ ४७ ]

हांसत नाचत जाऊं । जाऊं चला गोकुळाला! ॥ ध्रु० ॥
धांवत यमुना तीराला
घेउनी गोधनाला
हर्षभरें-घुमविन मी-मृदु मुरली—!
लइ येड कयेल, लई येड कयेल, बासरीनं; पिर्तिमीला ॥
घालुनि जयमाला-मिरवुंया नन्दलाला ॥
गाउनी गान, विसरुनी भान
मिरवुंया नन्दलाला !
हांसत नाचत जाऊं—
—शांताराम आठवले;—गोपाळकृष्ण, राधा, पेंद्या, कृष्ण, (शांता आपटे, परशराम, राम मराठे)

[ ४८ ]

उद्यां होईल राजा राम, रघुनंदन मेघश्याम गे ॥ ध्रु० ॥
कधीं उद्यां ?—हा उद्यां—राजा राम ?
हां हां निघे ध्वनी-त्रिभुवनीं-जय जय राम ? ॥ १ ॥
हांसूं ताऱ्यापरी नाचूं झऱ्यापरी ।
हांसूं फुलापरी—नाचूं मोरापरी ।
गाऊं पक्ष्यापरी-गाऊं भृंगापरी ।
गाऊं गुं गुं गुं गुं गान—
रघुनंदन मेघश्याम ॥ २ ॥
मी होईन कवी—गाणीं गाईन नवीं ।
कविराया हवी-राणी स्फूर्ति देवी ।
गाजे जयजय ध्वनी-पाहूं सिंहासनीं ।
रघुनंदन मेघश्याम राम,
उद्यां होईल राजा राम ॥ ३ ॥

—शांताराम आठवले; —भरतभेट, राजकवीची मुलगी-मुलगा
( कौसल्या-मधुसूदन )

[ ४९ ]

तो म्हणाला : सांगना गे मी तुझाना साजणी ?
ती म्हणाली : रत्नराया मी तुझ्या रे कोंदणीं ॥ १ ॥
तो म्हणाला : प्रेम म्हणजे वेड मजला वाटतें
ती म्हणाली : गोड अन् तें ओढ जीवा लावतें ॥ २ ॥
तो म्हणाला : भावनेचे खेळ सारे नाचरे
ती म्हणाली : जीवनाचा भावना आधार रे ॥ ३ ॥
तो म्हणाला : प्रीत करिते दो जीवांची एकता
ती म्हणाली : होय ना ? मग कां अशी ही दूरता

—शांताराम आठवले;—दहा वाजतां, आशा-अशोक ( रत्नमाला-कुळकर्णी )

[ ५० ]

दोन घडींचा डाव । त्याला जीवन ऐसें नांव । ध्रु० ॥
जगताचें हें सुरेख अंगण ।

खेळ खेळुंया सारे आपण ।
रंक आणखी राव
खेळुंया रंग आणखी राव । त्याला जीवन ऐसें नांव ॥ १ ॥
माळ यशाची हांसत घालूं ।
हांसत हांसत तसेच झेलूं ।
पराजययाचे घाव ।
झेलुंया पराजयाचे घाव । त्याला जीवन ऐसें नांव ॥ २ ॥
मनासारखा मिळे सौंगडी ।
खेळाला मग अवीट गोडी ।
दुःखाला नच वाव ।
दुःखाला नच वाव । त्याला जीवन ऐसें नांव ॥ ३ ॥
—शांताराम आठवले; —रामशास्त्री, जानकी ( बेबी शकुंतला )
राम ( अनंत मराठे )

[ ५१ ]

ऊठ गड्या ! चल, वीर गड्या ! घेउनि भाला ढाल गड्या ॥ ध्रु० ॥
शूर शिपाई शिवाजीचा तूं । मर्द मराठा मावळचा ।
ऊठ गड्या ! चल, शूर गड्या । दुष्मानावरि टाकी उड्या ॥ १ ॥
वीर जवान घरोघरीचे ते । जमले सर्व बरोबरीचे ।
ऊठ गड्या ! चल, वीर गड्या । तोडि आतां घरच्या बेड्या ॥ २ ॥
—गोविंदराव टेंबे; —सिंहगड-मावळे

[ ५२ ]

मन शुद्ध तुझं गोष्ट हाये पृथ्वी मोलाची ।
तूं चाल पुढं तुला रे गड्या भीति कशाची । पर्वा बी कुनाची ॥
झेंड्या भल्या कामाचा जो घेऊनि निगाला
कांटकुटं वाटमंदी बोचति त्येला,
रगत निगल, तरीबी हंसल, शाबास त्येची ॥ तूं चाल० ॥
जो ओळखितसे औक्ष म्हंजी मोटी लडाई ।
अन् हत्याराचं फूलावानि घाव बी खाई ।
गळ्यामंदी पडल त्येचा, माळ इजयाची ॥ तूं चाल० ॥
—शांताराम आठवले; —कुंकू, भिकारी ( परशराम )

[ ५३ ]

आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे ।
करूं काम, स्मरूं नाम, मुखीं राम हरीरे ॥
प्रानावानी पिर्ती रानीं
जुंपुनिया बैल गुनी
कष्ट केलं नागरुनी
देवाची स्वारी आली मिर्गावरी रे ॥ १ ॥

धान्याची पेर झाली
लक्षुमिन किर्पा केली
मोत्याची रास दिली
शिवारी पीक डोले राजापरी रे ॥ २ ॥

नाचत्याती पोरं थोरं
बागडती गुरं ढोरं
चला जाऊं सम्द्या म्होरं
बिगी बिगी बिगी गाडी हांकू खळ्यावरी रे ॥ ३ ॥

—शांताराम आठवले; —संत ज्ञानेश्वर, भैरू ( वसंत देसाई )

[ ५४ ]

जिवाच मैतर तुम्ही माझ्या ! ॥ ध्रु० ॥
चल चल, सरजा चल राजा-रे !
बागमळ्यांची दाटी रे
पिकती माणिक मोती रे
लव लव करिते हिरवळ रे
फुलली नाजुक मखमल रे ॥ जिवाच० मैतर० ॥ १ ॥

दौलत ही न्यारी
फुलवित शेतकरी
त्यास उणें सारें-दुनियेचें वैभव रे
चल चल सरजा-चल राजा रे ॥ जिवाच० ॥ २ ॥

मंगल घर अपुलं
गोकुळ गजबजलं !
प्रीत इथें झुळझुळेत ! सुख ममतेचं माहिर रे ॥ जिवाच० ॥ ३ ॥

—शांताराम आठवले; —शेजारी, रायबा ( चंद्रकांत )

[ ५५ ]

जय देवी मंगळागौरी। ओवाळीन सोनिया ताटीं,
रतनाचे दिवे, माणिकांच्या वाती, हीरेया ज्योती ॥ ध्रु० ॥
हळदीची वाटी, कुंकवाची लोटी
पूजेला ग आणिती जाईच्या कळ्या
सोळा तिकटी सोळा दूरवा
सोळा परिची पत्री, जाईजुई आबई
शेवंती नागचाफे पूजेला ग आणिती
साळीचे तांदूळ, मूगाची ग डाळ
आळणी खिचडी रांधिती नार
आपुल्या पतिलागीं, सेवा करिती फार
जय देवी मंगळागौरी० ॥ १ ॥

—शांताराम आठवले; —कुंकू, नीरा ( शांता आपटे )

[ ५६ ]

बाळा कां झोप येईना । कां चैन पडेना ॥
भूमि ही रुतलि राजसा या । माझ्या ।
माता देई अंकिं शैय्या । बाळा ।
घाली पांघरूण माया । वेल्हाळा ।
करि प्रेमळ गाना आई ।

—गोविंदराव टेंबे; —अयोध्येचा राजा, तारामती ( दुर्गा खोटे )

[ ५७ ]

बाघ्या—कुठं चाललीस चंद्रावळी ग, तुरुतुरु
चाललीस चंद्रावळी ।
किती सुकली चाफेकळी ।
सुंद्रा—पुजाया जातें मी मल्हारीला

वाघ्या—उन्हानं मुखडा घामेजला
सुंद्रा—येवढी चिंता का रं तुला
शिवूं नकोस पुजेच्या रं, येळीं ॥

वाघ्या—भंडार लाव, माझा अंगारा लाव
नवसाला पाव रे, नवसाला पाव
मल्हारी धांव, खंडोबा धांव
हां हां पालीचा, धांव मल्हारी ॥

—जोग-ललिता पवार, ( जयमल्हार )

[ ५८ ]

सुंद्रा—माझ्या व्हटाचं डाळींब फुटलं
सांगा राघू, मी नाहीं कधीं म्हटलं ॥
आतां नका रुसूं, जरा जवळ बसूं
खुदूखुदू हासूं, दोन जिवाचं भांडण मिट्लं ॥
नका वळवूं हो मान, करा शब्दाचा मान
बघा देवून ध्यान, माझ्या अंगावर कांटं उट्लं ॥
अम्हां बायकांची संवय । नाहीं म्हणजेच होय
आतां कशाचा संशय । राजाराणीचं नातं पट्लं ॥

—ललिता पवार ( जयमल्हार )

[ ५९ ]

वाघ्या—छबीदार नार गुलजार । चालली नटून ।
नाकांत नथ झोकांत । कशी लाखांत । दिसे ही उठून ॥
नेसली शालु भरजरी । गडद अंजिरी ।
दाटली वरी । चोळी तटतटून ॥
अर्धाच मिटे ही डोळा । टपोरा काळा । इष्काचा चाळा !
शिकली ही कुठून ॥
कंबर हालवी शंभर जागीं लवून । खेळत पाठीवर वेणीची
नागिणी । बघतांच मदन ये मनांतला खवळुनी ॥

शालुचा झोळ हातांत। पदर दांतांत।
लोक पहातात। सुंदरा झटून ॥
जा दणगट हातीं मनगट कुणी धरा ॥
महालांत गुंतवा गिरेबाज पांखरा ॥
बघू कोण मायेचा पूत असे रे खरा ॥
उठा झटकुनि नटा। रंगीची ॥ मस्ती घ्याया लुटून

—जोग, ( जयमल्हार )

[ ६० ]

भर दिवसा फुललें चांदणें
रंगलें हृदयाचें गाणें।
गडे त्या शब्दाची माधुरी,
मिष्किल नजर हांसरी, बोचरी,
करिते सगळीच दुनिया न्यारी,
त्या बघण्यानें, हंसण्यानें, स्पर्शानें
फुललें ग चांदणें, रंगलें हृदयाचें गाणें ॥ १ ॥

ते आले, बसले, गेले,
मी नाहीं बोलले,
ते क्षण पहिल्या भेटीचे,
गवसले हरपले,
अन् वेडे मन माझें हें राहिलें भुकेलें
आठवणीनें रंगलि स्वप्नें
फुललें ग चांदणें, रंगलें हृदयाचें गाणें ॥ २ ॥

—चूल आणि मूल; माया

[ ६१ ]

शेजारणीः—गुंफा वेणी। वेणी गुंफा ग साजणी।
बारा घरच्या बारा जणी।
आई आलों तुमच्या अंगणीं।
घेउनि करंडा फणी। गुंफा वेणी। वेणी गुंफा ग साजणी ॥

मागील दारीं तुळस मंजिरी डुले ।
रांगोळी घालिती प्राजक्ताचीं फुलें ।
सुटलें पाडस गाईकडे धांवलें ।
आई आलों अशा अंगणीं । गुंफुनी द्या वेणी । गुंफा वेणी ॥ १ ॥

फिरवा तुमचे हस्तक केसातुनी ।
आतां कशाला गजदंताची फणी ।
मोती मखे सगळी शोभा उणी ।
माया ममतेचीं हीं लेणीं । मिरवूं सर्वजणी । गुंफा वेणी ॥ २ ॥

पडे पाठीवर अशी थाप गोडशी ।
अहा विसरले आहे सासुरवासी ।
पदराखालीं घ्या हो तुमच्या कुशीं ।
झालें तुमची पोर पोटची न्हाते प्रेमाश्रूंनीं । गुंफा वेणी ॥ ३ ॥

—चूल आणि मूल ( बिम्बा )

[ ६२ ]

सांगूं नकोस बाले ! हें गोड गुपित आपुलें,
हृदयांत लपविलेलें ॥ धृ० ॥

नारिचें ! हृदय कसें गमतीचें,
निळ्या अंबरीं,
चढे वरि वरि । ग पतंगापरी,
प्रियकर जरि दोरी हातीं धरी ॥ १ ॥
हे दिवस भांडणाचे संपोनीया कधीं ग ।
येतिल मीलनाच्या रात्री पुन्हां कधीं ग ॥
या स्वप्निं रंगले मी । गुंगले मी । दंगले मी ॥ २ ॥

—चूल आणि मूल बिम्बा, ( माया )

[ ६३ ]

खेळे आंधळी कोशिंबिर खेळे ।
बांधुनी स्वतःचे डोळे । बांधुनी सख्याचे डोळे ॥ ध्रु० ॥
प्रीतिचें आंधळेपण, भुलवि हें मन,

मी खेळलें राज्य घेऊन,
खेळे । आंधळी कोशिंबिर खेळे ॥ १ ॥

उलटला डाव हा आतां । बघतां बघतां ।
त्यांच्यावरि गेलें ग राज्य । खेळा आतां
चाचपती येति धराया । रोखुनि वाटा
हुलकावणि देते त्यांना । येतां जातां—
सूब्यो-लडि सूब्यो-सूब्यो-
मी कुठें कुठें ? या इथें । त्या तिथें । लपते छपते
शेवटीं हळुच जाऊन, स्वतः होउन,
मी गवसेन तयाचया हातीं ।
खेळे । आंधळी कोशिंबिर खेळे ॥ २ ॥

—चूल आणि मूल, माया ( बिंबा )

[ ६४ ]

रमवाया राधिकेला ये सख्या नंदलाला ॥ ध्रु० ॥
सांज झाली गोकुळीं
तुझ्यावांचुनी सुचेना मुळीं
काहुर माझ्या उरीं दाटलें हुरहुर जीवाला १
साज फुलांचा तुजसि वाहुनि
ओवाळिन मी निरांजनानीं
जिवास माझ्या तुझ्या पुजेचा छंद हा लागला २
कधिची उभी ही विरही राधा
बावरते मनिं पुन्हा पुन्हा
घागर माझी राही रिकामी यमुनेला ३

—बाबुराव गोखले; —जागा भाड्यानें देणें आहे, लीला, (शांता आपटे)

[ ६५ ]

शुभमंगल झालें आपुलें
सात पावलें संगतीं तुझ्या आज प्रिया चाललें ॥ ध्रु० ॥
गौरीहार पूजियला भक्तीनें अंतरीं
असाच लाभो पती सातां जन्मांतरीं

लेणें मंगळसूत्राचें तुझ्यामुळें लाभलें १
आनंदाश्रूनीं भिजल्या मुंडावळी
मंगलाक्षतानीं भान हरपलें मुळीं
अंतरपाट होतां दूर जीवन हें वाहिलें २
माहेर आज मी तुजसाठीं सोडिलें
सासरीं तुजसवें पाऊल घातलें
दृष्ट न लागो सौभाग्य होवो रे घर भरलें ३

—बाबुराव गोखले; —जागा भाड्यानें देणें आहे, लीला, ( शांता आपटे )

[ ६६ ]

तो—मुशाफिरा ही दुनिया सारी घडी भराची वस्ती रे
ती—नसे महाली ख्याली खुशाली ती तर रस्तोरस्ती रे ॥ धृ० ॥
तो—लावुं नको रे हात कपाळीं
ती—तुझी रिकामी राहिल झोळी
तो—सुखदुःखाशीं हंसून खेळुन मुशाफिरा कर दोस्ती रे
ती—रोख आजला उद्यां उधारी
तो—ऐसी भय्या दुनियादारी
ती—कधीं गिरस्ती कधीं फिरस्ती झूट धनाची मस्ती रे
तो—आज अमीरी उद्यां फकीरी
ती—कुठेंहि भय्या टाक पथारी
तो—आलास नंगा जाशिल नंगा तुझी खुदाला धास्ती रे ३

—बाबुराव गोखले; —जागा भाड्यानें देणें आहे, भिकारी-भिकारीण

[ ६७ ]

सुंदरा मनामध्यें भरली, जरा नाहीं ठरली
हवेलींत शिरली मोत्याचा भांग
अरे गड्या, हौस नाहीं पुरली, म्हणोनी विरली
पुन्हां नाहीं फिरली कुणाची सांग
जशी कळी सोनचाफ्यांची, न पडुं पाप्याची,
दृष्टी सोप्याची नसेल ती नार
अति नाजुक तनु देखणी, गुणाची खणी,
उभी नवखणी चढून सुकुमार

जशी मन्मथरति धाकटी, सिहमय कटी
उभी एकटी गळयांमधीं हार
अंगि तारुण्याचा बहर, ज्वानिचा कहर
मारीते लहर मदन तलवार
पायीं पैंजण झुमकेदार, कुणाची नार
कोण सरदार हिचा भरतार
नाकामध्यें बुलाख सुरती, चांदनी वरती
चमकती परती, हिच्यापुढें फार
किनखाप अंगिचा लाल, हिजपुढें नको धन माल
कविराज चमकतो हीर, लोक जाहीर इतर शाहीर
काजवा वांग

—रामजोशी ( जयराम शिलेदार )

REFBK-0019515
REFBK-0019515

[ ६८ ]

कधि ... धिं भरिन मी हिरवा चुडा ॥ ध्रु० ॥
कधि पडतिल कानीं गोड सनईचे सुर
मी वधू-वेषानें पूजिन गौरीहार
घरिं मिरवत मिरवत येतील ग नवरदेव सुंदर
तीं रुसणी फुगणी आणिक् गोड बोलणी बोलणी ॥
ते कटाक्ष अधिरे लाडिक समजावणी
वाजेल मनीं गाजेल जनीं माझ्या नव्या प्रीतिचा चौघडा ॥
स्पर्शाची सुखकर ग ती साखर पेरणी
रंगायचा असा प्रीतिचा केव्हां गडे हा अमुचा विडा ॥

—सौ. संजीवनी मराठे; साखरपुडा, रतन ( इंदुमति )

[ ६९ ]

या भरल्या अंधारीं राहूं कुठवर मी एकटी
कशी सोडवूं जिवा भवतिची काळोखाची मिठी
आकाशांतुनि निखळुनि गेल्या कुठें तारका दूर
कुणी कोंडला अंतरांतला गोड सुखाचा सूर
माझ्यापासुनि कुणि तेजाची केली ताटातुटी
राहूं कुठवर मी एकटी ॥

—सौ. संजीवनी मराठे; —साखरपुडा, रेखा ( सुमती गुप्ते )

[ ७० ]

एक गुपित सांगते तुला–सांगते तुला ।
आवडसी तूं मला, शामला–गुपित सांगतें तुला ॥
दिवसा नयनीं–रात्रीं स्वप्नीं
हंससि तूं कोमला–शामला । गुपित सांगते तुला ॥
अशीच प्रतिमा असा पितांबर
असेच डोळे सतेज सुंदर
असाच हंसरा भाव मुखावर
गतजन्मीं पाहिला–शामला । गुपित सांगते तुला ॥
सांग प्रिया ही ओळख कुठली
किती युगांनीं आजच पटली
कण कण काया माझी नटली
जीव गडे लोभला–शामला । गुपित सांगते तुला ॥

—माडगूळकर, —सीता स्वयंवर, सीता ( बेबी शकुंतला )

[ ७१ ]

एक सुरांत घुंगरु बोले
जोडी बैलांची डौलांत चाले रे सजणा चाले
पाणी मोत्यांचा झोतापरी। पाटापाटांत झुळझुळु करी
ओल्या वाफ्यांत मोतीयां डोले ॥ १ ॥
बाग रायाचा आला भरा। जाईजुई फुलें मोगरा
सोनें शेवंतीला लागलें ॥ २ ॥
डेरे दारग आंब्यावरी । काळी मैना कुहुकुहु करी
गाणें गाण्यांत मिळुनी गेलें ॥ ३ ॥

—माडगूळकर, —जिवाचा सखा, चंद्रा ( सरोज बोरकर )

— समाप्त —

१८५७४